06 DEC 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'समतेशी करार' हे माणूसपणाकडे नेणारे पुस्तक

## प्रकाश पवार : शाहू स्मारक भवनमध्ये प्रकाशन समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारतीय समाजात विषमतेची गती अधिक आहे. ती समताधिष्ठित हवी, ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका होती. 'समतेशी करार' हे पुस्तक सामाजिक समता व न्यायाचा आग्रह धरताना पर्यायांचीही मांडणी करते व समाजाला माणूसपणाकडे नेते, असे प्रतिपादन डॉ. प्रकाश पवार यांनी केले.



कोल्हापुरातील शाहू स्मारक भवनात 'समतेशी करार' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी गौतमीपुत्र कांबळे, मधू कांबळे, सुरेश शिपूरकर, प्रकाश पवार, भरत शेळके उपस्थित होते.

शाहू स्मारक भवनात पत्रकार मधू कांबळे लिखित 'समतेशी करार' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाप्रसंगी ते शनिवारी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिपूरकर, सेक्युलर मूव्हमेंटचे अध्यक्ष गौतमीपुत्र कांबळे, कार्याध्यक्ष भरत शेळके उपस्थित होते. एक्स्प्रेस पब्लिशिंग हाऊस व सेक्युलर मूव्हमेंटतर्फे हा कार्यक्रम झाला.

सुरेश शिपूरकर म्हणाले, पुस्तकामुळे मी अस्वस्थ व आश्वस्त झालो आहे. आरक्षण कशासाठी, अॅट्रॉसिटी का हे साकल्याने समजून घ्यायला हवे.

गौतमीपुत्र कांबळे म्हणाले, या पुस्तकातील भूमिका सर्वसमावेशक असून अॅट्रॉसिटी, आरक्षण आणि जातिव्यवस्थेचा वेध घेतला आहे.

डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, सामुराई होण्याची चळवळ सर्वत्र सुरू व्हावी, हा मुख्य बिंदू असलेल्या या पुस्तकाने सामाजिक पैलूंचा वेध घेत डोळ्यांत अंजन घातले आहे.

मधू कांबळे यांनी मनोगतात पुस्तकामागील भूमिका विशद केली. अर्जुन देसाई यांनी स्वागत केले. डॉ. भरत नाईक यांनी आभार मानले.

06 DEC 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

हेल्पर्स ऑफ दी हँडीकॅप्डचे पुरस्कार प्रदान

# दिव्यांगांचा सन्मानाने स्वीकार गरजेचा : यशवंत थोरात

लोकमत न्यूज नेटवर्क

**उचगाव :** व्यक्तिमत्वातील अनिष्ठ गोष्टी हेच खरे अपंगत्व आहे. सामाजिक, प्रशासकीय अशा विविध पातळ्यांवर दिव्यांगांचा सन्मानाने स्वीकार होणे महत्त्वाचे आहे, असे मत अर्थतज्ज्ञ आणि नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात यांनी व्यक्त केले.

येथील हेल्पर्स ऑफ दी हँडीकॅप्ड या सेवाभावी संस्थेच्या वतीने जागतिक अपंग दिनानिमित्त आयोजित अपंग मित्र व भरारी पुरस्कार प्रदान कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख पाहुणे होते.

यावेळी अपंग मित्र व भरारी पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. शिक्षण, साहित्य, तंत्रज्ञान, अर्थकारण व कृषी अशा बहुविध क्षेत्रांत मोलाची कामगिरी करणाऱ्यांची उपस्थिती लाभली. संस्थेच्या समर्थ वियालायातील २६ गुणवंत विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. कोरोनाचा प्रादुर्भाव शिगेला पोहोचलेला असताना जीवाची पर्वा न करता आपल्या सहकाऱ्यांना मदत करणाऱ्या स्वप्ननगरी प्रकल्पातील ५ कोरोना योध्यांचाही याप्रसंगी सन्मान केला. ग्रामीण विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी डॉ. थोरात यांच्याकडून पुढील वर्षीपासून विशेष पुरस्कार देण्यात येणार आहेत, असे याप्रसंगी त्यांनी जाहीर केले.

संस्थेने मूलभूत ग्रामीण तंत्रज्ञान प्रशिक्षण सुरू करावे. त्यासाठी आवश्यक सहाय्य पुरविण्याची इच्छा प्रा. अनिता दांडेकर यांनी व्यक्त केली. तर या उपक्रमासाठी विद्यापीठाच्या संबंधित सर्व विभागांकडून आवश्यक सर्व सहाय्य पुरविण्याचे आश्वासन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिले. मदतीची सर्वांना गरज भासते. अपंग व सुदृढ व्यक्तींमध्ये मदतीची देवाणघेवाण होत असते. त्याला सेवेचे रूप देता कामा नये, असे विचार श्रीमती सोनाली नवांगुळ यांनी व्यक्त केले.




हेल्पर्स ऑफ दी हँडीकॅप्डच्या वतीने पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. १) अनिता दांडेकर यांच्या हस्ते दीपक पोवार यांना गुणगौरव पुरस्कार देण्यात आला. २) डॉ. यशवंत थोरात यांच्या हस्ते सोनाली नवांगुळ यांना भरारी पुरस्कार दिला. ३) कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते अनिता दांडेकर यांना अपंगमित्र पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## अपंग मित्र पुरस्कार

अभियांत्रिकी क्षेत्रात विशेष ठसा उमटविणाऱ्या आणि अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सहाय्य करणाऱ्या विशेषत: कौशल्याधारित शिक्षण प्रसारात महत्त्वाचे योगदान देत असणाऱ्या प्रा. अनिता दांडेकर यांना अपंग मित्र पुरस्काराने सन्मानित केले गेले.

## भरारी पुरस्कार

साहित्य क्षेत्रातील आश्वासक नाव, ज्यांनी आपल्या मेहनत व जिद्दीने साहित्य क्षेत्रातील सुप्रतिष्ठित अशा साहित्य अकादमी पुरस्कारावर आपले नाव कोरले, त्या सोनाली नवांगुळ यांना भरारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## गुणगौरव पुरस्कार

कोणत्याही विशेष प्रशिक्षणाविषयी कल्पकता, शोधक वृत्ती व प्रयोगशीलता या खास कौशल्याचा वापर करून उपयुक्त व दर्जेदार नवनिर्मिती करणारे हेल्पर्सच्या व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील गुणवंत कर्मचारी श्री. दीपक कुश्याप्पा पोवार यांचा गुणगौरव करण्यात आला.

यावेळी उंचगावच्या सरपंच मालूताई काळे, महावीर महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र लोखंडे आदी उपस्थित होते. संस्थेचे माजी विद्यार्थी बंडोपंत हराळे यांनी प्रार्थना सादर केली. संस्थेच्या संघटक रेखा देसाई यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्ष प्रमोद देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. माजी विद्यार्थी सोनाप्पा गावडे व पुनर्वसन सहायक तानाजी देसाई यांनी मानपत्र वाचन केले. सचिव तेजश्री शिंदे यांनी आभार व्यक्त केले.

0 6 DEC 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अपंगांचा सन्मानाने स्वीकार व्हावा

## डॉ. यशवंतराव थोरात; हेल्पर्सच्या अपंगमित्र, भरारी पुरस्कारांचे वितरण

उचगाव : पुढारी वृत्तसेवा

व्यक्तिमत्त्वातील अनिष्ट गोष्टी हेच खरे अपंगत्व आहे. सामाजिक, प्रशासकीय अशा विविध पातळ्यांवर अपंग व्यक्तींचा सन्मानाने स्वीकार होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात यांनी केले. ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आपल्याकडून पुढील वर्षीपासून विशेष पुरस्कार देण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

जागतिक अपंग दिनानिमित्त उचगाव (ता. करवीर) येथील हेल्पर्स ऑफ दि हँडिकॅप्ड संस्थेच्या वतीने अपंगमित्र आणि भरारी पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख पाहुणे होते.

डॉ. शिर्के म्हणाले, थोडी संधी, थोडा वाव आणि प्रोत्साहन ही अपंगांनी व्यक्त केलेली अपेक्षा अतिशय रास्त आहे. याला समाजाने प्रतिसाद द्यायला हवा.




**उचगाव : येथील हेल्पर्स ऑफ दि हँडिकॅप्ड संस्थेच्या वतीने सोनाली नवांगुळ यांना भरारी पुरस्कार प्रदान करताना डॉ. यशवंतराव थोरात. सोबत कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के व मान्यवर.**

यावेळी अभियांत्रिकी क्षेत्रात विशेष ठसा उमटवणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सहाय्य करणाऱ्या, विशेषतः कौशल्याधारित शिक्षण प्रसारात महत्त्वाचे योगदान देत असणाऱ्या प्रा. अनिता दांडेकर यांना अपंगमित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच मेहनत व जिद्दीने साहित्य क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविलेल्या सोनाली नवांगुळ यांना भरारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच संस्थेच्या समर्थ विद्यालयातील २६ गुणवंत विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. स्वप्ननगरी प्रकल्पातील पाच कोरोना योद्ध्यांचाही सन्मान करण्यात आला. कोणत्याही विशेष प्रशिक्षणाविषयी कल्पकता, शोधक वृत्ती व प्रयोगशीलता या खास कौशल्यांचा वापर करून उपयुक्त व दर्जेदार नवनिर्मिती करणारे हेल्पर्सच्या व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील गुणवंत कर्मचारी दीपक कुशाप्पा पोवार यांचा गुणगौरव करण्यात आला.

संस्थेने मूलभूत ग्रामीण तंत्रज्ञान प्रशिक्षण सुरू करावे त्यासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य पुरवण्याची इच्छा प्रा. अनिता दांडेकर यांनी व्यक्त केली, तर या उपक्रमासाठी विद्यापीठाच्या संबंधित सर्व विभागाकडून आवश्यक सर्व सहाय्य पुरवण्याचे आश्वासन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिले.

मदतीची सर्वांना गरज भासते. अपंग व सुदृढ व्यक्तींमध्ये मदतीची देवाणघेवाण होत असते. त्याला सेवेचे रूप देता कामा नये, असे विचार सोनाली नवांगुळ यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाला उचगावच्या सरपंच मालुताई काळे, महावीर महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र लोखंडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. संस्थेच्या संघटक श्रीमती रेखा देसाई यांनी प्रास्ताविक केले, अध्यक्ष प्रमोद देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेचे माजी विद्यार्थी सोनाप्पा गावडे आणि पुनर्वसन सहायक तानाजी देसाई यांनी मानपत्र वाचन केले. संस्थेच्या सचिव श्रीमती तेजश्री शिंदे यांनी आभार मानले.

0 6 DEC 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांगांना सकारात्मक प्रतिसाद मिळणे महत्त्वाचे

## कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के; प्रा. अनिता दांडेकर, सोनाली नवांगुळ यांना पुरस्कार प्रदान

वार्ताहर
उचगाव

दिव्यांगांना थोडी संधी, थोडा वाव आणि प्रोत्साहनाची व्यक्त केलेली अपेक्षा अतिशय रास्त आहे. समाजाने त्याला सकारात्मक प्रतिसाद द्यायला हवा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

उचगाव (ता. करवीर) येथील हेल्पर्स ऑफ दी हॅण्डीकॅप्ड संस्थेच्यावतीने दिव्यांग दिनी प्रा. अनिता दांडेकर यांना अपंगमित्र तर सोनाली नवांगुळ यांना भरारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात होते. 'हेल्पर्स'च्या व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील कर्मचारी दीपक पोवारसह समर्थ विद्यालयातील २६ गुणवंतांना गौरवले. स्वप्ननगरी प्रकल्पातील ५ कोरोना योद्ध्यांचाही सन्मान करण्यात आला. संस्थेने मुलभूत ग्रामीण तंत्रज्ञान प्रशिक्षण सुरु करावे. त्यासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य विद्यापीठाकडून करण्याचे आश्वासन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिले.

डॉ. यशवंतराव थोरात यांनी व्यक्तिमत्वातील अनिष्ट गोष्टी हेच खरे अपंगत्व आहे. विविध पातळ्यांवर



उचगाव : येथे हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड संस्थेच्यावतीने सोनाली नवांगुळ यांना भरारी पुरस्कार प्रदान करताना डॉ. यशवंतराव थोरात. सोबत कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के.

दिव्यांगांचा सन्मानाने स्वीकार होणे महत्वाचे आहे. ग्रामीण विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी पुढील वर्षीपासून विशेष पुरस्कार देण्यात येतील, असे स्पष्ट केले.

सोनाली नवांगुळ यांनी, मदतीची सर्वांना गरज भासते. अपंग, सुदृढांमध्ये मदतीची देवाणघेवाण होत असते, त्याला सेवेचे रूप देता कामा नये, असे स्पष्ट केले.

माजी विद्यार्थी बंडोपंत हराळे यांनी प्रार्थना सादर केली, संघटक रेखा देसाई यांनी प्रास्ताविक केले, अध्यक्ष प्रमोद देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. माजी विद्यार्थी सोनाप्पा गावडे आणि पुनर्वसन सहाय्यक तानाजी देसाई यांनी मानपत्र वाचन केले. संस्था सचिव तेजश्री शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला उचगावच्या सरपंच मालुताई काळे, प्राचार्य राजेंद्र लोखंडे, मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य प्रमोद म्हांगोरे, विश्वास सुतार, विठ्ठल कोतेकर, ॲड भीमराव कोतेकर, डॉ अरुणा भिर्डी, स्वरदा नाईक, अनंत घोटगाळकर, प्रसाद जमदग्नी, नीलाम्बरी कुलकर्णी, राजेंद्र सुडशिंगीकर आदी मान्यवर उपस्थित होते.

लोकमत

# निवडक शोधनिबंधांचे पुस्तक प्रकाशित

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात झालेल्या ऑनलाइन आंतरराष्ट्रीय परिषदेत सादर झालेल्या निवडक शोधनिबंधांच्या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सोमवारी झाले.

विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियान, विद्यार्थी विकास विभाग व केरळमधील सनातन धर्म महाविद्यालय यांच्यातर्फे १२ व १३ फेब्रुवारी २०२१ या कालावधीत ऑनलाइन आंतरराष्ट्रीय परिषद घेण्यात आली. या परिषदेत सादर केलेल्या एकूण शोधनिबंधांपैकी ४५ उत्कृष्ट शोधनिबंधाचे त्याच नावाचे पुस्तक तयार करण्यात आले आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बेटी बचाओ अभियानाचे सर्व अधिविभागीय समन्वयक उपस्थित होते. बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. पी. बी. देसाई यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. एल. तरवाळ यांनी आभार मानले.

06 DEC 2021

जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महामानवांच्या विचारांना व्यापक भूमिकेतून समजून घेण्याची गरज

## शरद गायकवाड : शिवाजी विद्यापीठात पारितोषिकांचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महामानवांच्या विचारांना व्यापक भूमिकेतून समजून घेण्याची आज नितांत गरज आहे. जात, धर्म, प्रांत, आदी कोणत्याही भेदभावात न अडकविता आपण फुले-शाहू-आंबेडकर या महामानवांना समजून घेतले तर खऱ्या अर्थाने माणूस बनण्याच्या प्रक्रियेची ती सुरुवात ठरते, असे प्रतिपादन प्रा. शरद गायकवाड यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे आयोजित स्पर्धांच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

राजर्षी शाहू सभागृहा झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. बाबासाहेबांचे हे ग्रंथप्रेम व अफाट वाचन यांचा वारसा घेतला पाहिजे, तरच स्वतःला परिपूर्ण माणूस म्हणून घडवू शकतो, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले. या संशोधन व विकास केंद्रातर्फे वक्तृत्व, प्रश्नमंजूषा स्पर्धा ऑनलाईन घेतल्या. विजेत्यांना डॉ. शिर्के यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान केली. यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रकाश कुंभार, गिरीश मोरे, दीपा श्रावस्ती, अमोल मिणचेकर आदी उपस्थित होते. डॉ. एस. एस. महाजन यांनी प्रास्ताविक केले. तेजश्री सावंत-मोहरेकर यांनी सूत्रसंचालन केले. अविनाश भाले यांनी आभार मानले.

**विजेते असे :** **वक्तृत्व स्पर्धा :** मिथुन माने, प्रवीण येवले, हृषीकेश घुटुगडे, प्रणय निमसरकार, प्रसाद लोखंडे, प्राजक्ता गायकवाड, संभाजी पाटील, गुरुराज रसाळ, मृणाल कोठाली, श्रद्धा चोपडे, श्रुती कांबळे, मनाली शिरगावे. **प्रश्नमंजूषा स्पर्धा :** तनुजा पाटील, प्रतिभा पाटील, स्वप्नाली देसाई, रोहन गुरव, शिवांजली पाटील, अश्विनी गुदमेवार.

0 6 DEC 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांगांना सर्वसामान्यांहून वेगळे समजणे गैर : बडवे

कोल्हापूर : प्रतिनिधी

दिव्यांगांप्रती भेदभाव बाळगून त्यांना सर्वसामान्यांपेक्षा वेगळे समजणे गैर आहे, असे मत पुणे येथील निवांत अंध मुक्त विकासालयाच्या संस्थापक-संचालक मीरा बडवे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, यूजीसी स्किम फॉर पर्सन्स विथ डिसअॅबिलिटीज आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित ऑनलाईन कार्यक्रमात त्या बोलत होत्या.




बडवे म्हणाल्या, 'निवांत'मधून हजारो मुले शिकून बाहेर पडली आणि आज किमान ७८ नातवंडांची मी आजी आहे. या दिव्यांग मुलांना संस्थेपेक्षा कुटुंबाची गरज अधिक असते, असे मी अनुभवातून ठामपणे सांगू शकते.

लेखिका सोनाली नवांगुळ म्हणाल्या, दिव्यांग विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ तत्पर आणि संवेदनशील असल्याचा मला वैयक्तिक अनुभव आहे. आपल्या वेगळ्या जगण्याचा विद्यापीठाच्या व्यासपीठावरून परामर्श घेण्याची मिळालेली संधी खूप महत्त्वाची आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी काही नवे उपक्रम विद्यापीठाच्या माध्यमातून उभे करूया, जे राज्य आणि देशभरात आदर्शवत ठरेल.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, दिव्यांग व्यक्तींना सहानुभूतीची नव्हे, तर समान हक्क, अधिकार प्रदान करण्याची आवश्यकता आहे, हे बडवे यांच्या व्याख्यानातून अधोरेखित झाले. स्वागत डॉ. नमिता खोत यांनी केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्यासह डॉ. जगन कराडे यांची उपस्थिती होती.

0 6 DEC 2021
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाबासाहेबांनी जपले कोल्हापूरशी ऋणानुबंध!

## राजाराम महाविद्यालयाच्या गॅदरिंगमध्ये भाषण; उच्च शिक्षणाबाबत मौलिक विचारांची मांडणी

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

**महापरिनिर्वाण दिन विशेष**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज व कोल्हापूरशी विशेष ऋणानुबंध होते. १९५२ मध्ये राजाराम महाविद्यालयाच्या गॅदरिंगला उपस्थित राहून त्यांनी ज्ञानप्रक्रियेबाबत विचार मांडले. याच भेटीत त्यांनी बिंदू चौकात उभारलेला स्वत:चा पुतळा पाहिला हे विशेष.

बाबासाहेबांच्या जीवनामध्ये अनेकवेळा त्यांना गॅदरिंगसाठी निमंत्रणे आली. परंतु त्यांनी ती स्वीकारली नाहीत. १९५२ मध्ये राजाराम महाविद्यालयाचे निमंत्रण मात्र त्यांनी स्वीकारले. गावोगावी तोरणे उभारून, कमानी उभारून त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी माईसाहेब आंबेडकर त्यांच्यासोबत होत्या. २४ डिसेंबर १९५२ रोजी त्यांनी राजाराम महाविद्यालयाच्या गॅदरिंगमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून इंग्रजीत भाषण केले. 'राजारामियन' या नियतकालिकाच्या १९५३ च्या अंकात भाषणाचा वृत्तांत प्रकाशित झाला आहे. 'डॉ. आंबेडकरांचे ज्ञानाचे शिखर' असे शीर्षक नियतकालिकाने वृत्तांतास दिले आहे.

ज्ञानप्रक्रियेबाबत महत्त्वाचे भाषण डॉ. आंबेडकर यांनी केले. भाषणात ते म्हणतात, 'विद्यार्थी हा विद्यार्थी असला पाहिजे. ज्ञानाचा पाठपुरावा करतो तो विद्यार्थी होय. लग्न करीत नाही तो ब्रह्मचारी नव्हे तर ब्रह्मचारी म्हणजे जो अत्यंत उत्कटपणे ज्ञान मिळवतो तो!' भारतीय, ब्रिटिश व अमेरिकन अशा विविध पाच विद्यापीठांत मी शिकलो. महाविद्यालयात प्राध्यापक व प्राचार्य म्हणून काम केले, पण माझा ज्ञानाचा व्यासंग कधीच कमी झाला नाही. महाविद्यालयीन शिक्षणाचे दोन उद्देश त्यांनी भाषणात सांगितले. पहिला अस्तित्वाच्या संघर्षासाठी जीवनाच्या सागरातील विविध विषयांच्या ज्ञानाचा पुरेसा [illegible] एकत्रित करणे; तर दुसरा सभोवतालचे व भूतकाळातील जीवन समजून घेण्यासाठी माणसाने बुद्धी वापरणे. वर्तमान हा भूतकाळाचा वारसा व भविष्याची तयारी असते. युरोप व अमेरिकेतील विद्यार्थी अशा ज्ञानाने सुसज्ज आहेत. प्राध्यापक व डेमॉन्स्ट्रेटर्स या दोघांकडून कोलंबिया विद्यापीठातील वर्ग चालविला जात असे. या दोघांतील कामाची विभागणी डॉ. आंबेडकरांनी भाषणात स्पष्ट केली.

### बाबासाहेबांनी पाहिला स्वत:चाच पुतळा!

कोल्हापूर भेटीप्रसंगी राजाराम महाविद्यालयातील कार्यक्रमास डॉ. आंबेडकर उपस्थित होते. त्यानंतर बिंदू चौकात करवीरच्या जनतेने भाई माधवराव बागल यांच्या नेतृत्वाखाली उभारलेला स्वत:चा पुतळा 'याचि देही याचि डोळा' डॉ. आंबेडकर यांनी पाहिला. हाच त्यांचा जगातील पहिला पुतळा होय. याभेटीदरम्यान प्राचार्य पत्रावळे यांच्या घरी जिमखानाप्रमुख पी. डी. कदम, विद्यार्थी खाशाबा जाधव (ऑलिम्पिक पदक विजेते) यांनी डॉ. आंबेडकर यांच्यासोबत भोजनाचा आस्वाद घेतल्याचा उल्लेख आढळतो.

"राजाराम महाविद्यालयाच्या गॅदरिंगमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्ञानप्रक्रियेबाबत व उच्च शिक्षणाबाबत महत्त्वाचे भाषण केले. यातून विद्यार्थी व शिक्षणाप्रती असणारी त्यांची आस्था अधोरेखित होते. डॉ. आंबेडकर यांचे कोल्हापूरशी वेगळे नाते राहिले आहे. बाबासाहेबांची ही शेवटची कोल्हापूर भेट ठरली.

**- प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन,**
संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : बिंदू चौकात उभारलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा.

06 DEC 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्ह्याचे नेमके उत्पन्न समजणार

## शिवाजी विद्यापीठाचा अर्थशास्त्र विभाग करणार सहा जिल्ह्यांचा उत्पन्न अंदाज प्रकल्प

ओंकार धर्माधिकारी :
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाला जिल्हा उत्पन्न अंदाज प्रकल्प देण्यात आला आहे. राज्याच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडून हा प्रकल्प देण्यात आला असून, या अंतर्गत राज्यातील सहा जिल्ह्यांचा उत्पन्न अंदाज काढण्यात येईल. यामुळे जिल्ह्याचे नेमके उत्पन्न किती हे समजणार आहे. जिल्हानिहाय उत्पन्न निश्चित करण्याची पद्धत पहिल्यांदाच



विकसित होणार आहे. हा प्रायोगिक प्रकल्प असून, सहा जिल्ह्यांच्या उत्पन्न निश्चितीनंतर सर्व जिल्ह्यांसाठी ही पद्धत अवलंबली जाणार आहे, अशी माहिती अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी दिली.

देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न (जी.डी.पी) मोजले जाते. त्यातून देशाच्या अर्थव्यवस्थेचा अंदाज येतो. याचा उपयोग विविध प्रकारच्या योजना,




आर्थिक धोरण ठरवताना होतो. देशातील बरेचसे उद्योग, व्यवसाय असे आहेत ज्यांची मोजदात सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या दृष्टिकोनातून होत नाही. राज्याची स्थितीही अशीच असून, अद्याप जिल्हा उत्पन्न अंदाज मोजले जात नाही. याची पद्धत अद्याप विकसित नाही. त्यामुळे अर्थ व सांख्यिकी संचालनाल्याकडून प्रायोगिक तत्त्वावर राज्यातील सहा जिल्ह्यांचे उत्पन्न अंदाज काढले जाणार आहेत. त्यासाठीचा प्रकल्प विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाला दिला आहे. लवकरच कामाला सुरूवात होईल. शेती, उद्योग, व्यापार आणि सेवाक्षेत्रासह अन्य बाबींचीही मोजदाद होणार आहे. यामुळे जिल्ह्याच्या नेमक्या उत्पन्नाचा अंदाज येईल. कोणत्या व्यावसायिक क्षेत्रात किती लोक कार्यरत आहेत, रोगजार क्षमता किती आहे, कोणत्या क्षेत्रात किती गुंतवणूक करावी लागेल. अशा अनेक बाबी समोर येतील. प्रायोगिक प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर याच पद्धतीने इतर जिल्ह्यांचे उत्पन्न अंदाज घेतले जातील. त्यातून राज्याच्या उत्पन्नाचा अंदाज येईल. भविष्यात राज्य सरकारला धोरण बनवताना, योजना आखताना नेमकी माहिती हाती असल्याने त्यातील अचुकता वाढेल.

### अधिकाऱ्यांना प्रशिक्षण

पहिल्या टप्प्यात कोल्हापूर, सिंधुदुर्ग, उस्मानाबाद, नंदुरबार, नागपूर, यवतमाळ या जिल्ह्यात हा प्रकल्प राबवला जाणार आहे. या अंतर्गत तेथील सांख्यिकी अधिकारी, जिल्हा नियोजन समितीचे सचिव व अन्य अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

**“ राज्याचा उत्पन्न अंदाज नेमका किती हे पहायचे असल्यास असंघटित क्षेत्रातील उत्पन्नाचाही अंदाज घेतला पाहिजे. यासाठी हा प्रकल्प उपयोगी ठरणार आहे. यामुळे जिल्हा उत्पन्न अंदाज निश्चितीची पद्धत विकसित होणार असून, भविष्यात त्याचा वापर देशभर करता येईल. यासाठी वेगवेगळ्या उत्पन्न अंदाज करण्याच्या पद्धती अभ्यासण्यात येतील.**

**- प्रा. डॉ. ज्ञानदेव तळुले,** अर्थशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ

**दृष्टिक्षेपात...**

- राज्याच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचा प्रकल्प
- देशातील पहिलाच प्रकल्प
- जिल्हानिहाय उत्पन्न निश्चितची पद्धत पहिल्यांदाच विकसित होणार
- राज्य सरकारला धोरण बनवताना, योजना आखताना मिळणार नेमकी माहिती
- कोणत्या क्षेत्रात किती लोक कार्यरत, रोगजार क्षमता किती याचा अंदाज येणार

06 DEC 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा यंदाचा दीक्षांत 'पेपरलेस'...

## ऑनलाईन अर्जाची प्रिंट सादर न करण्याच्या सूचना : शिवाजी विद्यापीठाची पर्यावरणपूरक वाटचाल : ८० हजार स्नातक घेणार प्रमाणपत्र

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्र घ्यायचे म्हंटले की अर्ज भरून अर्जाची प्रिंट पूरक कागदपत्रासह विद्यापीठात जमा करावी लागते. यामध्ये विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा आणि कष्ट वाया जाते. त्यामुळे यंदा २००२ या शैक्षणिक वर्षापासूनच्या पुढील विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज भरायचा आहे. ऑनलाईन अर्जाची प्रिंट विद्यापीठात सादर करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे यंदाचा दीक्षांत समारंभ 'पेपरलेस' अन् 'पर्यावरणपूरक' होणार आहे.

पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज भरणे, त्याची प्रिंट विद्यापीठात जमा करणे यात विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा आणि कष्ट वाया जात होते. ऐवढे करूनही अचूकपणे पदवी प्रमाणपत्र मिळेलच याची खात्री नव्हती. यापुर्वी प्रमाणपत्रावरील चुकांमुळे अनेकदा गोंधळाचे वातावरण निर्माण



झाले होते. २०१६-१७ शैक्षणिक वर्षात तत्कालीन कुलसचिवांच्या सहीविनाच पदवी प्रमाणपत्र छापल्याचा प्रकार उघडकीस आला होता. त्यामुळे दोन दिवसात दुबार पदवी प्रमाणपत्राची छपाई करण्यात आली होती. असे प्रकार टाळण्यासाठी यंदाच्या दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज स्विकारण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने घेतला आहे. विद्यार्थी हिताचा निर्णय घेतल्याने शिक्षण क्षेत्रातून या निर्णयाचे स्वागत होत आहे.

### एसएमएस आणि ई मेलव्दारे मिळणार माहिती

यंदाच्या दीक्षांत समारंभात ८० हजार विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर प्रमाणपत्रासाठी अर्ज करतील. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर ई मेल व एसएमएसद्वारे पदवीदान समारंभाविषयी माहिती मिळणार आहे. एखाद्याने जर डबल शुल्क भरले असल्यास ज्यादाचे शुल्क त्याच्या बँक खात्यावर परत पाठवले जाईल. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांचा वेळ, त्रास वाचणार आहे. तसेच विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या कामातही सुटसुटीतपणा येईल.

– गजानन पळसे
(परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक, शिवाजी विद्यापीठ)

दीक्षांत समारंभासाठी आलेल्या प्रिंटेड अर्जाची छाननी करून पुन्हा ऑनलाईन सिस्टिममध्ये अपडेट करावे लागत होते. यंदा २००२ पासूनच्या सर्वच विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअरमध्ये पीआरएन नंबर टाकला की त्याची संपूर्ण माहिती उपलब्ध होणार आहे. येथे असणाऱ्या माहितीमध्ये जर त्रुटी असतील तर परीक्षा भवनशी संपर्क साधून या त्रुटींची पुर्तता करावी लागणार आहे. यानंतर पदवी प्रमाणपत्राचा अर्ज ऑनलाईन भरता येणार आहे. पेमेंट गेटवेच्या माध्यमातून अर्जाचे शुल्कही ऑनलाईन केले आहे. तर १९६५ ते २००१ सालापर्यंतच्या पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी आणि इम्प्रुव्हमेंट, एम. फिल., पीएच. डी.च्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरून त्याची प्रिंट स्वत:कडे ठेवायची आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना पुर्वीचे गुणपत्रक स्कॅन करून अर्ज भरायचा आहे. लॉ., बी. कॉम., आणि शिक्षणशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या स्पेशल विषयाची नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुटसुटीत असल्याने विद्यार्थी व महाविद्यालयाकडून समाधान व्यक्त केले जात असून विद्यापीठाच्या या निर्णयाचे कौतुक होत आहे.

### मूळ गुणपत्रकाशिवाय भरता येणार अर्ज

विद्यापीठाने कोरोना काळात ऑनलाईन परीक्षा घेवून गुणपत्रकही ऑनलाईन दिले आहे. परंतू अद्याप मूळ गुणपत्रक न मिळालेल्या पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज कसा भरायचा असा प्रश्न विद्यार्थ्यांना पडला आहे. परंतू पीआरएन नंबरवर सर्व माहिती उपलब्ध होणार असल्याने मूळ गुणपत्रकेशिवाय पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज भरणे शक्य आहे अशी माहिती विद्यापीठाने दिली आहे.

महासत्ता
एकच आवृत्ती

# दिव्यांगांना सर्वसामान्यांहून वेगळे समजणे गैर-बडवे

कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी)-

दिव्यांगांप्रती भेदभाव बाळगून त्यांना सर्वसामान्यांपेक्षा वेगळे समजणे गैर आहे, असे मत पुणे येथील निवांत अंध मुक्त विकासालयाच्या संस्थापक-संचालक मीरा बडवे यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, युजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलीटीज् आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष ऑनलाईन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. मीरा बडवे म्हणाल्या, दिव्यांग तसेच विशेष दृष्टी मुले यांना सर्वसामान्यांहून वेगळे समजणे चुकीचे आहे. सामाजिक पातळीवर त्यांना समजून घेऊन मुख्य प्रवाहात सक्षमपणाने सामील होण्यासाठी मदत करण्याची आवश्यकता आहे.

लेखिका सोनाली नवांगुळ म्हणाल्या, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी काही नवे उपक्रम विद्यापीठाच्या माध्यमातून उभे करू या, जे राज्य आणि देशभरात आदर्शवत ठरेल. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांचे अध्यक्षीय मनोगत झाले.

# प्रा. वसंत पाटणकर यांना पुरस्कार जाहीर

कोल्हापूर, ता.४(प्रतिनिधी)-

................................

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने दिला जाणारा डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक, कवी, प्रा. वसंत पाटणकर यांना जाहीर झाला आहे. ५१ हजार रुपये, सन्मानचिन्ह, ग्रंथभेट असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार वितरण समारंभ दि. २९ जानेवारी, २०२२ रोजी विद्यापीठात संपन्न होणार आहे.

कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे यांच्या उपस्थितीत ही घोषणा आज केली. हा पुरस्कार वितरण समारंभ ज्येष्ठ विचारवंत डॉ.गणेश देवी यांच्या हस्ते व शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ). डी. टी. शिर्के यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या पुरस्कार निवड समितीचे सदस्य म्हणून रंगनाथ पठारे, डॉ.राजन गवस व डॉ.अविनाश सप्रे यांनी काम पाहिले.

# महामानवांना समजून घेणे ही माणूस बनण्याच्या प्रक्रियेची सुरवात

## - प्रा. शरद गायकवाड

कोल्हापूर, ता.४(प्रतिनिधी)-

................................

महामानवांना समजून घेणे ही माणूस बनण्याच्या प्रक्रियेसाठीची महत्त्वाची सुरुवात आहे, असे प्रतिपादन विचारवंत प्रा. शरद गायकवाड यांनी नुकतेच येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने आयोजित विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते.

डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या १३० व्या जयंतीच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने वक्तृत्व स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा ऑनलाईन घेण्यात आल्या. त्यातील विजेल्यांना कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.यावेळी केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. तेजश्री सावंत मोहरेकर यांनी केले तर प्रा. अविनाश भाले यांनी आभार मानले. कार्यक्रमाला प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. डॉ. प्रकाश कुंभार, प्रा. डॉ. गिरीश मोरे, डॉ. दीपा श्रावस्ती, प्रा. अमोल मिणचेकर, डॉ. व्ही. एस. खंडागळे, डॉ. मुरली भानारकर, आनंद खामकर, तेजपाल मोहरेकर, सुशांत पंडित, विक्रम कांबळे आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय विचारांचे प्रखरतेने निर्भिड दैनिक
महासत्ता
एकच

# बिंदुनामावली तपासण्यासाठी तीन पथके

कोल्हापूर, ता.२(प्रतिनिधी)-

..............................

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील रिक्त पदे भरण्यावरील निर्बंध शिथील करण्याच्या शासनाच्या निर्णयानुसार महाविद्यालयातील शिक्षक पदांच्या बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी करण्याचे आयोजन केले आहे. त्यास अनुसरुन शिवाजी विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक पदांच्या बिंदुनामावली दि. ०१.१०.२०१७ विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय पदमान्यतेच्या अनुषंगाने बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी करण्याचे ठरविले आहे.

महासत्ता एकच आवृत्ती

# उद्योग उभारणीमध्ये महिलांनी पदार्पण करावे

## -डॉ.अपर्णा राव

कोल्हापूर,ता.२० (प्रतिनिधी)-

जागतिकीकरणाच्या स्पर्धेत आज सामाजिक गरजांमध्ये बदल होऊन वाढ होत असताना या परिस्थितीत नाविन्यपूर्ण उद्योगांना यशस्वी होण्याच्या संधी उपलब्ध होत आहेत, या संधीचा फायदा घेण्यासाठी शहरी व ग्रामीण भागातील महिलांनी पुढाकार घेऊन नाविन्यपूर्ण उद्योग क्षेत्रात पदार्पण करावे, यासाठी महिला बचत गटांनी पुढाकार घ्यावा प्रतिपादन आयआयटी मुंबई येथील डॉ. अपर्णा राव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, मध्यवर्ती रोजगार कक्ष व कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी सूक्ष्म उद्योजकता संधी या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. राव बोलत होत्या. यावेळी श्रीमती वैशालीताई महाडिक या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या या कार्यक्रमासाठी शेप फाउंडेशन, नागपूरचे अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. गजानन राशिनकर, कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण हे व्यासपिठावर उपस्थित होते..

प्रसाद राव यांनी अधिकाधिक महिलांनी उद्योग क्षेत्रात पदार्पण करणे आवश्यक असून महिलांमधील अविष्कार या यशस्वी उद्योगातून प्रदर्शित होणे गरजेचे असल्याचे सांगितले.कार्यक्रम आयोजनासाठी प्रा. डॉ.भारती पाटील प्रा.डॉ.एम गुरव यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वीते साठी प्रा. मिलिंद सावंत,डॉ.अश्विनी पाटील, किरण शिंदे, लता चौगुले, विद्या कांबळे, वैशाली मदाने,शोभा पाटील यांनी सहकार्य केले. डॉ.नेहा वाडेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. गजानन राशिनकर यांनी आभार मानले.

भाग्यरेखा गर्दी
DOLBY
DIGITAL

महासत्ता एकच आवृत्ती

# सोमदत्त देसाईची निवड

कोल्हापूर,ता.१८(प्रतिनिधी)-

..............................

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात शिकणाऱ्या सोमदत्त देसाई या विद्यार्थ्याची निवड या महिन्यात गोवा येथे होणाऱ्या ५२ व्या इफ्फी ( इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल ऑफ इंडिया) येथे झाली आहे. देशाचे ७५ वे स्वातंत्र्य वर्ष साजरा करण्यासाठी केंद्र सरकारकडून राबवण्यात येत असलेल्या आझादी का अमृत महोत्सव आणि इफ्फीच्या ७५ क्रिएटीव्ह माइन्डस ऑफ टुमारो या उपक्रमा अंतर्गत ही निवड करण्यात आली.

देशभरातून सृजनशील अशा ७५ विद्यार्थ्यांची त्यांच्या आतापर्यंतच्या कामाचे परीक्षण करुन ही निवड प्रक्रिया नामांकित ज्युरीच्या समितीकडून झालीआहे. या ज्युरीमध्ये प्रसून जोशी, केतन मेहता, शंकर महादेवन, मनोज बाजपेयी, रेसूल पोकुट्टी, वाणी त्रिपाठी-टीक्कू, अनंत विजय, यतींद्र मिश्रा, संजय पुरण सिंग, सचिन खेडेकर यांचा समावेश आहे.

महासत्ता
एकच आवृत्ती

## शिवाजी विद्यापीठाच्या नव्या अभ्यासक्रमास प्रवेश सुरू

कोल्हापूर, ता.१८(प्रतिनिधी)-

.................................

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने पी. जी. डिप्लोमा इन डॉ. बी. आर. आंबेडकर थॉट आणि सर्टिफिक्टे कोर्स इन इंडियन कॉन्स्टीटयुशन या अभ्यासक्रमाकरीता दि. ३०नोव्हेंबर अखेर प्रवेश सुरू झालेले आहेत. तरी सर्व विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा.पी. जी.डिप्लोमा इन डॉ. बी. आर. आंबेडकर थॉट अभ्यासक्रमाचा कालावधी १ वर्षे आहे. तरी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

महासत्ता एकच आवृत्ती

# लोकशाही प्रक्रियेत विद्यापिठांचे सहकार्य अभिप्रेत-देशपांडे

**कोल्हापूर,ता.१८(प्रतिनिधी)-**

लोकशाही प्रक्रियेत युवकांचा सहभाग वाढणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने महाविद्यालये आणि विद्यापीठे यांचे सहकार्य मोठ्या प्रमाणात अभिप्रेत आहे, असे प्रतिपादन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी केले. श्री. देशपांडे यांनी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट देऊन विद्यापीठातील निवडक अधिकारी व प्राचार्य यांच्यासमवेत सविस्तर चर्चा केली आणि त्यांना युवकांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढविण्याविषयी विविध सूचना व प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन केले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील व जिल्हाधिकारी राहुल रेखावार प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के म्हणाले, महाविद्यालये आणि त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावे यांची सांगड घालून त्या विभागात मतदार नोंदणीचा कार्यक्रम अधिक कार्यक्षमपणाने राबविणे शक्य आहे, असेही त्यांनी सांगितले.

06 DEC 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गतवर्षीपेक्षा यंदा वायू प्रदूषणात वाढ

**शहरातील वायू गुणवत्ता निर्देशांक 111 वर**

**पुढारी वॉच**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

वायू प्रदूषणाचा विळखा दिवसेंदिवस कोल्हापूर शहराभोवती घट्ट होत चालला आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा शहरातील वायू प्रदूषणात वाढ झाली असून, ऑक्टोबर महिन्यात शहराचा वायू गुणवत्ता निर्देशांक १११ वर पोहोचला आहे. यामुळे व्याधिग्रस्तांसाठी शहरातील हवा घातक बनली आहे.

गेल्या वर्षभरात (१ जानेवारी २०२१ पासून) वायू गुणवत्ता निर्देशांकानुसार कोल्हापुरात स्वच्छ हवेची नोंद एकदाही झालेली नाही. ऑक्टोबर महिन्यात दाभोळकर कॉर्नर परिसरातील केंद्रावरून ८ वेळा वायू प्रदूषणाची स्थिती मोजण्यात आली होती. यापैकी तब्बल सातवेळा येथील हवा मानवी शरीरासठी घातक होती. यावरून शहरातील वाढत्या वायू प्रदूषणाची स्थिती लक्षात येते.

राजधानी दिल्ली येथील वायू गुणवत्ता निर्देशांक (एअर क्वालिटी इंडेक्स) हा ३०० ते ३९० इतका आहे. हा अतिघोकादायक मानला जातो.

शहरातील वायू प्रदूषणाची वाटचालदेखील धोकादायक दिशेने सुरू आहे. दाभोळकर कॉर्नर परिसर व महाद्वार रोड परिसरामध्ये ऑक्टोबरमध्ये वायू निर्देशांक अनुक्रमे १११ व ११० इतका होता. तसेच शहरातील वाढत्या धुळीमुळे शहरवासीय अक्षरश: हैराण झाले आहेत. दाभोळकर कॉर्नर परिसरामध्ये ऑक्टोबर महिन्यात अतिसूक्ष्म धूलिकण (एसपीएम) व श्वसनीय धूलिकणांचे (आरएसपीएम) सर्वाधिक प्रमाण २९७ व ११७ मायक्रोग्रॅम क्युबिक मीटर इतके होते.

व्याधिग्रस्तांसाठी शहरातील हवा घातक आहे.

वायू गुणवत्ता निर्देशांकानुसार १०० च्या आतील हवा ही समाधानकारक मानली जाते, तर ५० च्या आतील हवा ही उत्तम मानली जाते. याचा श्वसन संस्थेवर कोणताही धोकादायक परिणाम होत नाही. मात्र, शहरातील दाभोळकर कॉर्नर व महाद्वार रोड परिसरातील 'एक्यूआय'ने १०० चा आकडा पार केला आहे. यामुळे दीर्घकाळ या परिसरामध्ये वावरल्यास कोमॉर्बिडिटी असणाऱ्या मुलांसाठी व वयोवृद्धांसाठी ही हवा अत्यंत घातक असल्याचे 'एमपीसीबी'च्या अहवालात सांगण्यात आले आहे.



| वायू निर्देशांक | हवा | आरोग्यावरील परिणाम |
|---|---|---|
| ० ते ५० | उत्तम | - |
| ५१ ते १०० | समाधानकारक | सेन्सिटिव्ह लोकांवर परिणाम |
| १०१ ते २०० | मध्यम | मुले व वृद्धांसाठी धोकादायक |
| २०१ ते ३०० | खराब | श्वास घेण्यास त्रास |
| ३०१ ते ४०० | अतिखराब | गंभीर श्वसन विकारांचा धोका |
| ४०० ते पुढील | धोकादायक | निरोगी लोकांसाठीही गंभीर |

**ऑक्टोबर महिन्यातील वायू गुणवत्ता निर्देशांक**

शिवाजी विद्यापीठ....... 63
दाभोळकर कॉर्नर....... 111
महाद्वार रोड............ 110



पुढारी

# हिवाळी सत्रातील परीक्षांच्या विलंब, अतिविलंब शुल्कात शंभर टक्के सवलत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ हिवाळी सत्रातील परीक्षांच्या विलंब व अतिविलंब शुल्कात शंभर टक्के सवलत देण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने घेतला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ऑक्टोबर - नोव्हेंबरच्या २०२१ हिवाळी सत्रातील परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा प्रसिद्ध केल्या आहेत. त्यानुसार सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था, विद्यापीठ अधिविभाग स्तरावर विद्यार्थ्यांच्याकडून परीक्षा अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही सुरू आहे. परीक्षा शुल्कासोबत कोणत्याही विद्यार्थ्याकडून विलंब शुल्क अथवा अतिविलंब शुल्क स्वीकारण्यात येऊ नये, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी केले आहे.